**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-००००03-२०१५**

**नियमित दिवाणी दावा क्र. १/२०१५**

**निशाणी क्र. ३१३ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ सह आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ सुमित्रा नथुराम तिर्लोटकर हीचे दि. ०२/११/२०२३ रोजी तिर्लोट, ता. देवगड येथे निधन झाले आहे. तरी मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस याकामी सामील करणेत यावे अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार नमुद अर्जातील वारस रेकॉर्डवर आणण्याकरिता दिलेली कारणे चुकीची, बेकायदेशीर व खोटी आहेत. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.३१५ सोबत मयत प्रतिवादी क्र.३ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ३ सुमित्रा नथुराम तिर्लोटकर या दिनांक ०२/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा ठरावासाठी व कायम ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## – आदेश –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये २००/– देण्याच्या अटीवर माफ करणेत येत आहे.

३. वादीने प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घेवून तशी त्वरीत १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी.

NANDA BAPUSO GHATAGE

Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.10.10 16:47:19 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः ०९/१०/२०२४

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.